# प्रेसनोट

दि.१८/०३/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | कर्जत पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| कलम | लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७(अ), |
| आरोपीचे नांव व कार्यालय | सचिन सुरेश क्षीरसागर, वय—३५ वर्ष, रा.मिरजगांव ता.कर्जत, जि.अहमदनगर धंदा— खाजगी कर्मचारी, तलाठी, सजा कोकणगाव—घुमरी यांचे कार्यालयात, ता.कर्जत, जि.अहमदनगर. |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये १०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये १०००/— |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांनी त्यांचे घुमरी गावातील वडिलोपार्जित शेतीचे वाटणी पत्र केले होते. सदर वाटणीपत्राचे आधारे फेरफार नोंद करुन उतारा मिळणेकामी तलाठी घुमरी, सजा कोकणगांव यांचे कडे अर्ज दिला होता. त्या वाटणी पत्राचे आधारे तलाठी यांचेकडुन फेरफार नोंद करुन उतारा मिळवून देण्यासाठी तलाठी कार्यालयात मदतनीस म्हणून काम करणारे आरोपी सचिन सुरेश क्षीरसागर, वय—३५ वर्ष, रा.मिरजगांव ता.कर्जत, जि.अहमदनगर धंदा— खाजगी कर्मचारी, तलाठी, सजा कोकणगाव—घुमरी यांचे कार्यालयात, यांनी तक्रारदार यांच्याकडे दि. १५/०३/२०२१ रोजी केलेल्या लाचमागणी पडताळणी कारवाईत त्यांनी १०००/— रुपयांची मागणी केली होती. सदर लाचमागणीच्या आधारे, आज दि.१८/३/२०२१ रोजी मिरजगांव येथे लाचेचा सापळा आयोजीत केला असता, आरोपी क्षीरसागर यांनी तक्रारदार यांचेकडुन १०००/— रुपये लाचेची रक्कम, जगदंब ईलेक्ट्रिकल समोर, नगर सोलापूर हायवे, मिरजगांव येथे पंच साक्षीदारासमक्ष स्वीकारली असता आरोपी यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in

ई—मेल :— acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :— acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :— १०६४

दुरध्वनी क्रमांक :— ०२४१—२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:— ९९३०९९७७००

(हरीष खेडेकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर